महात्मा फुले शिक्षण संस्थेचे,

## कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर

## राज्यशास्त्र विभाग आणि निवडणूक साक्षरता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने

# मतदान जनजागृती

## व्याख्यान अहवाल (शुक्रवार, 2 ऑगस्ट 2024)

आज शुक्रवार दि. 2 ऑगस्ट 2024 रोजी सकाळी 10:30 वा. राज्यशास्त्र विभागाच्या वतीने 'मतदान जनजागृती' या विषयावर सौ. धनश्री यादव (नायब तहसीलदार, उरूण-इस्लामपूर) यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. सौ. धनश्री यादव यांनी आपली मांडणी करताना मतदान हा आपला लोकशाही व्यवस्थेमधील सर्वात महातवाच अधिकार असून त्यामुळे आपल्या व आपल्या देशाच्या जीवनावर त्याचा कोणता प्रभाव पडतो याविषयी विस्ताराने मार्गदर्शन केले. त्या म्हणाल्या लोकशाही स्थिर आणि भक्कम करण्यासाठी मतदानाचा टक्का वाढला पाहिजे आणि त्यामध्ये तरुणांची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. मतदान करताना जात, धर्म, पंथ, भाषा, प्रदेश, लिंग यांचा कोणताही अभिनिवेश न बाळगता तसेच कोणत्याही प्रकारच्या आमिषाला बळी न पडता योग्य उमेदवार पाहून मतदान करावे.मतदान हे दान नसून तो आपला सर्वात महत्वाचा राजकीय अधिकार आहे. त्याच्या माध्यमातून आपण आपणाला पाहिजे असणारी आणि आपल्या जीवनातील अनेक समस्यांचे निराकरण करणारी शासनव्यवस्था निर्माण करू शकतो. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कॉलेजचे उपप्राचार्य प्रा. डॉ. संदीप पाटील होते. त्यांनी आपल्या मनोगतामध्ये आपल्या स्वातंत्र्यसैनिकांनी लढून प्राप्त केलेली लोकशाही टिकविण्याची आपली जबाबदारी ओळखून आपण सर्वानी मतदान केले पाहिजे तसेच आपले नातेवाईक, मित्रमंडळी, शेजारी यांनाही मतदान करण्यास प्रोत्साहित करावे अशी विनंती विद्यार्थ्यांना केली.

या व्याख्यानाचे संयोजन राज्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष खडसे आणि डॉ. अंगद पाटील यांनी केले होते. स्वागत व प्रास्ताविक प्रा. डॉ. संतोष खडसे यांनी केले तर आभार डॉ. अंगद पाटील यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. हरिश वसावे यांनी केले.

HEAD
Department of Political Science
Karmaveer Bhaurao Patil College
Islampur.Tal.Walwa,Dist.Sangli (M.S.)

PRINCIPAL
Karmaveer Bhaurao Patil College
Urun-Islampur, Dist.Sangli. 415 409




मार्गदर्शक: सौ. धनश्री यादव (नायब तहसीलदार, उरूण-इस्लामपूर)




उपस्थित विद्यार्थी